आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१३ डिसेंबर २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- मुंबईला झोपडपट्टीमुक्त करण्यासह घरांचा प्रश्न सोडवण्याच्या संदर्भातले अनेक निर्णय राज्य सरकारकडून जाहीर

- बार्टी, सारथी, सारख्या संस्थांच्या योजनांसाठी मार्गदर्शक तत्वं निश्चित करण्याचं सरकारचं आश्वासन

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतल्या लाभार्थ्यांना ई-केवायसीमध्ये ३१ डिसेंबरपूर्वी एकदा दुरुस्ती करता येणार

- शेतकऱ्यांच्या आत्महत्या, राज्यातली ढासळलेली कायदा-सुव्यवस्थेची स्थिती यासह विविध मुद्दे अंतिम आठवडा प्रस्तावात विरोधकांकडून उपस्थित

**आणि**

- लोकसभेचे माजी सभापती आणि माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील - चाकूरकर यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**<><><><><>**

मुंबईतल्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी हाऊसिंग फॉर ऑल योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केली. याबाबतचं निवेदन त्यांनी विधीमंडळात सादर केलं. या योजनेत आर्थिकदृष्ट्या मागास घटकांसाठी ३०० चौरस फुटापर्यंतचा एफएसआय विनामूल्य तर अल्प उत्पन्न गटासाठी ६०० चौरस फुटापर्यंतच्या सदनिकेची पुनर्बांधणी विनामूल्य करण्याची तरतूद या योजनेत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी शहरात सतरा ठिकाणी समूह पुनर्विकास योजना राबवणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज

विधानपरिषदेत केली. याशिवाय इतरही अनेक योजनांची घोषणा त्यांनी आज केली. याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड व्हाइस कास्ट**

*एसआरए अभय योजनेला ३१ डिसेंबर २०२६पर्यंत मुदतवाढ, म्हाडाच्या ओसीसीसाठीच्या अभय योजनेला एक वर्षाची मुदतवाढ तसंच एसआरए प्रकल्पातल्या तक्रार निपटाऱ्यासाठीच्या यंत्रणेत वाढ करण्याची घोषणाही त्यांनी केली.*

*मुंबईतल्या ५० एकर किंवा त्यापेक्षा मोठ्या खासगी, शासकीय किंवा निमशासकीय जमिनींवर आता एकत्रितपणे झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबवली जाणार आहे. योजनेच्या पहिल्या टप्प्यात अँटॉप हिल, कृष्ण नगर आणि केतकीपाडा, गोपीकृष्ण नगर, ओशिवरा, गोवंडी, चिता कॅम्प, चेंबूर, टागोर नगर, विक्रोळी पार्कसाईट, भांडुप अशा १७ प्रमुख ठिकाणांची निवड करण्यात आली आहे. छोट्या-छोट्या एसआरए प्रकल्पांऐवजी आता संपूर्ण परिसराचा कायापालट करण्यासाठी ही योजना राबवली जाईल, असं शिंदे म्हणाले. प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात आणखी काही प्रकल्प हाती घेतले जाणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.*

*जुन्या लोकांना तातडीनं घरं देणं तसंच नवीन प्रकल्पांसाठी मुबलक घरं उपलब्ध होण्यासाठी हौसिंग स्टॉक निर्माण करण्याची घोषणाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आज केली. या हौसिंग स्टॉककरता मुंबईतल्या तसंच राज्यातल्या काही प्रकल्पांचा समावेश करण्यात येणार असल्याचं उपमुख्यमंत्र्यांनी सांगितलं.*

***होल्ड बाईट शिंदे (२७ सेकंद)***

*नवी मुंबईत सिडकोच्या वेगवेगळ्या प्रवर्गातल्या घरांसाठी सिडकोनं जे दर निश्चित केले होते, त्यात १० टक्के कपात करण्यात येत असल्याची घोषणाही शिंदे यांनी केली. या निर्णयामुळे आता ही घरं पूर्वीपेक्षा स्वस्त दरात उपलब्ध होणार आहेत.*

**<><><><><>**

शेतकऱ्यांना ई पीक पाहणीसाठी आता १५ जानेवारीपर्यंत ऑफलाईन अर्ज करता येतील, असं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत सांगितलं. आमदार विक्रम पाचपुते यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. ई-पीक पाहणीसाठी तीन वेळा मुदतवाढ देऊनही अनेक शेतकरी तांत्रिक

अडचणीमुळे नोंदणी करू शकले नाहीत, या पाहणीची नोंद सातबाऱ्यावर असल्याशिवाय नाफेड किंवा शासकीय केंद्रांवर शेतमाल खरेदी केला जात नाही, त्यामुळे शेतकऱ्यांचं नुकसान होत असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. यावर ई-पीक पाहणीचं पोर्टल परत सुरू करणं तांत्रिकदृष्ट्या शक्य नाही. त्यामुळे ऑफलाईन अर्जाचा पर्याय दिल्याचं बावनकुळे यांनी सांगितलं.

<><><><><>

राज्य विधीमंडळात महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन विकास आणि विनियमन सुधारणा विधेयक आज मंजूर झालं. यामुळं एकाच परवान्याच्या आधारे राज्यातल्या सर्व बाजारपेठांमध्ये व्यवहार करता येतील. तसंच इतर राज्यांत जारी केलेला परवाना सुद्धा राज्यात वापरता येईल. वार्षिक किमान ८० हजार मेट्रिक टन उलाढाल असलेल्या तसंच २ राज्यांतून आवक असलेल्या बाजार समितीला याद्वारे राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार हे मानांकन मिळेल. याशिवाय शेतकरी–विक्रेता आणि बाजार समितीतले वाद, पणन संचालकांना ३० दिवसांत निकाली काढावे लागतील. त्यावरचं अपील राज्य सरकारला ३० दिवसात निकाली काढावं लागेल, अशी तरतूद सुद्धा या विधेयकात आहे.

या सर्व सुधारणांमुळे राज्यात एकसंध, आधुनिक, पारदर्शक आणि स्पर्धात्मक कृषी बाजारव्यवस्था निर्माण होऊन शेतकऱ्यांना अधिक चांगल्या दरांचा लाभ मिळेल, अशी अपेक्षा सरकारने व्यक्त केली आहे.

<><><><><>

बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत यासारख्या स्वायत्त संस्थांद्वारे अंमलबजावणी होणाऱ्या योजनांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता आणली जाईल तसंच योग्य निकषांसह मार्गदर्शक तत्वं निश्चित केली जातील, असं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिलं. या संस्थांची शिष्यवृत्ती ३ वर्षांपासून रखडली असल्याचा प्रश्न डॉ. नितीन राऊत यांनी विचारला होता, त्यावर ते बोलत

होते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल-वंचित घटकांतल्या, परदेशात शिक्षण घेण्याची क्षमता नसलेल्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्राधान्यानं मदत करण्याचा सरकारचा उद्देश असल्याचंही पवार म्हणाले.

<><><><><>

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतल्या लाभार्थ्यांना ई-केवायसी दुरुस्तीसाठी एकच संधी मिळणार असून त्यांनी ती प्रक्रिया ३१ डिसेंबर पर्यंत पूर्ण करावी असं आवाहन राज्य सरकारनं केलं आहे. या योजनेच्या बहुतांश लाभार्थी या दुर्गम, ग्रामीण भागातल्या असल्यानं ई-केवायसी प्रक्रिया करत असताना काही चूक होणं स्वाभाविक आहे. त्यामुळेच या चुका दुरुस्त करण्याची संधी दिली जात आहे.

<><><><><>

दिव्यांग व्यक्तींना सामजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी दिव्यांग-अव्यंग विवाह प्रोत्साहन योजनेअंतर्गत अनुदानाच्या रकमेत राज्य सरकारनं वाढ केली आहे. दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी आज ही माहिती दिली. अशा जोडप्यांमधे एकजण दिव्यांग असल्यास दीड लाख रुपये, तर दोघेही दिव्यांग असल्यास अडीच लाख रुपये अनुदान मिळेल.

<><><><><>

शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कृषी क्षेत्रातल्या निधीचा अपव्यय, राज्यातली ढासळलेली कायदा-सुव्यवस्थेची स्थिती, वाढती गुन्हेगारी इत्यादी मुद्द्यांवरून काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी आज सरकारवर निशाणा साधला. हिवाळी अधिवेशनाच्या अंतिम आठवडा प्रस्तावावर ते आज विधानसभेत बोलत होते. अतिवृष्टीचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांना सरकारनं जाहीर केलेलं ३१ हजार कोटी रुपयांचं पॅकेज कागदावरच राहिलं. कोरडवाहू शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १८ हजार ५०० रुपये द्यायची घोषणा केली, पण प्रत्यक्षात त्यांना फक्त ८ हजार ५०० रुपये मिळाले, असं सांगून वडेट्टीवार यांनी सरकारला धारेवर धरलं.

***होल्ड... बाईट- विजय वडेट्टीवार (२४ सेकंद)***

**<><><><><>**

माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्यावर आज शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. लातूर शहराजवळच्या वरवंटी इथं त्यांच्या शेतात लिंगायत समाजाच्या परंपरेनुसार त्यांचा दफनविधी करण्यात आला. यावेळी पोलीस दलानं हवेत फैरी झाडून चाकुरकर यांना मानवंदना दिली. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह सर्वपक्षांचे नेते आणि विविध क्षेत्रांतले मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

दहशतवादी कृत्यांशी संबंधित आर्थिक व्यवहारांच्या संशयावरून सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीनं ठाणे जिल्ह्यातल्या पडघा इथं गुरुवारी छापेमारी केली होती. स्थानिक आरक्षित जंगलातून खैर लाकडाची छाटणी आणि तस्करी केल्याप्रकरणी पडघ्यातील आयसीसयच्या एका मॉड्युलचा कथित सहभाग असल्याचा संशय ईडीला आहे. या छापेमारीत तीन कोटी ७० लाखांची रोकड आणि सहा कोटींचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आल्याची माहिती ईडीनं शनिवारी दिली.

**<><><><><>**

राज्यात काल जळगाव इथं ७ अंश सेल्सिअस इतकं सर्वात कमी किमान तापमान नोंदवलं गेलं. येत्या दोन दिवसांत राज्यातलं हवामान मुख्यतः कोरडं राहील. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येईल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**